REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# विद्यापीठांचे पदवीप्रदान समारंभ की फॅशन का जलवा

डॉ. तुषार निकाळजे

**प्रस्तावना :**

एका विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभाच्या ड्रेसकोडविषयी उलटसुलट व वादग्रस्त चर्चा चालू आहे. संघटना, सामाजिक कार्यकर्ते, आजी-माजी कुलगुरू, प्रसारमाध्यमे याबाबत चर्चा व वेगवेगळी वक्तव्ये करीत आहेत. विद्यार्थी पाच-सहा वर्षे कष्ट करून पदवी मिळवितो, त्याचे आई-वडिल स्वतःच्या मुलाचे-मुलीचे करिअर होण्यासाठी घाम गाळतात, रक्त आटवितात आणि त्यांच्या पदव्या वाटपासाठी ड्रेसकोड ठरविण्याच वादळ किती संयुक्तीक? विद्यार्थी, त्यांचे आई-वडिल यांच्या व्यतिरिक्त इतरांना पदवीप्रदान समारंभ म्हणजे फॅशन शो वाटतो का? आणि वेगवेगळे कपडे, ड्रेस घालून मिरवायला हा लग्न समारंभ की फॅशन शो समजला जात आहे.

दरवर्षीप्रमाणे मुलीच्या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाला गेल्या महिन्यात गेलो होतो. दोन-तीन तास हा कार्यक्रम चालू असतो. शाळेतील विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन देखील होते. त्यामध्ये त्यांचा एक विविध कपडे घालून फॅशन शो देखील झाला. छोट्यांनी रॅम्प वॉक करताना सभागृहातील पालकांनी, शिक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. हा रॅम्पवॉक चालू असताना विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे शिक्षकही होते, मुलांना धैर्य, सपोर्ट करण्यासाठी. मी माझ्या पत्नीला म्हणालो, ''हा फॅशन शो विद्यार्थ्यांचा कि शिक्षकांचा कि पालकांचा.'' कारण त्या हॉलमधील दृष्य तसेच होते. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकही वेगवेगळ्या फॅशनचे कपडे परिधान केलेले. कदाचित त्यांना वर्षातील एखादा दिवसच मिळत असेल, बाकी दिवस त्या शाळेचा ड्रेसकोड असलेला ड्रेस, साडी, ओव्हरकोट घालावा लागतो. पालकांना वर्षातील हा एक हौसेचा दिवस. त्यांनीही वेगवेगळ्या पॅटर्नचे कपडे परिधान केलेले. एकूण फॅशनची जत्राच भरलेली. पण फॅशन ही फक्त कपड्यांपुरतीच मर्यादित नसते. वेगवेगळ्या अंगठ्या, कानातील, हातातील, गळ्यातील दागदागिने घालणे ही एक ऐश्वर्य दिखाऊपणाची फॅशन. हल्ली आयर्नमॅनपेक्षा गोल्डमॅनची फॅशनच चालू झाली आहे. प्रत्येक रात्री फॅशन बदलणारे पॅरीस हे जागतिक शहर प्रसिध्द आहे. हा झाला अंगवस्त्र फॅशन बदलण्याचा प्रकार. परंतु काहींना दुचाकी, चारचाकी बदलण्याच्या फॅशनची वेगळीच नशा असते. विदेशी, मॉडीफाईड, विविध रंगी, विविध मॉडेल्सच्या गाड्या बदलणे हे त्यांच्या रईसपणाच्या फॅशनच प्रतिक असत. काहींना फॅशनची घरे बदलण्याचा शौक असतो. रो-हाऊस, ड्युप्लेक्स, वेल फर्निश्ड-स्विमींग टॅंक, क्लब हाऊस, बंगले बदलण्याचीदेखील सवय असते. काही फॅशन म्हणून वेगवेगळी रंगीत, महागडी, देशी-विदेशी सरबते पिण्याचा शौक करतात. काहीजण वेळावेळी आलेल्या फॅशनप्रमाणे घरातील फर्निचर, खिडक्याचे पडदे, हॉल-बाथरूम-स्वच्छतागृहाच्या टाईल्स बदलण्याचा शौक असतो. त्याकरिता ईटालियन टाईल, फ्रेंच कमोड, चिनी शॉवर इत्यादी फॅशनच्या वस्तूंचा वापर करतात. हे सर्व वैयक्तिक किंवा सामुहिक फॅशनचे नमुने. परंतु काहीजण आपल्या व्यावसायिक व पारंपारिक पेशाप्रमाणे एखादा ड्रेसकोड वापरतात. यांना समाजाची एकप्रकारे मान्यता आणि अभिमानच असतो. उदा. वकिल, डॉक्टर, नर्स, हॉटेलमधील वेटर्स इत्यादी. परंतु हल्ली व्यवस्थेतील मंडळीदेखील यात



मागे नाहीत. एखादे सेमिनार, कॉन्फरन्स, मिटींग असल्यास आपण उठावदार कसे दिसू यावर जास्त चर्चा होते. वरील कार्यक्रमास कोणी कोणत्या फॅशनचे ड्रेस, साड्या, पँट-शर्ट, कोट घालायचा यावर चार-चार दिवस चर्चा असते. मिटींग फक्त दोन तासांची असते. यानिमित्ताने फोटो ऑपॉर्चुनिटीचा फायदा घेवून वॉटस्‌ॲप व्हायरल करणारे वेगळेच.

काही मंत्रीमहोदयांची फॅशन वेगळीच. एका दिवसांत पाच ड्रेस बदलले जातात. सकाळी एखादा ड्रेस, त्यावर सोन्याच्या दोऱ्याने/तारेने केलेली कलाकुसर, अंदाजे किंमत रू. ३० लाखापर्यंत. दुपारी वेगळा ड्रेस. याच दिवशी असलेल्या एखाद्या शोकसभेस साधा ड्रेस. परंतु या पाच वेगवेगळ्या ड्रेसपेक्षा एखादा ड्रेस संपूर्ण दिवस घालणे उचितच झाले असते. एखाद्या सामान्य माणसाने सोन्याच्या कलाकुसरीचा ड्रेस घातला असता तर त्याच्यामागे इन्कमटॅक्स, ईडी, अँटीकरप्शनच्या चौकश्या सुरू झाल्या असत्या. अशावेळी गांधीजींच्या चम्पारण व खेडा सत्याग्रहाचा विसर पडतो. सन १९१८ मध्ये बिहारमधील ब्रिटीश जमीनदारांच्या राज्यातील दारू, अस्पृष्यता, आरोग्य सोयी यांच्याविरूध्द सत्याग्रह केला. त्यावेळी गांधीजींनी सूटा-बूटाचा त्याग करून शेतकरी वापरत असलेला साधा भारतीय पेहराव घालणे सुरू केले. आजचे सरकार हे सूट बूटकी सरकार असे राजकारणी संबोधतात. उलट शेतकऱ्यांसारख्या साध्या माणसांच्या सभेस सूटबूट घालणे पसंद करतात आणि त्यावर विरोधक राजकारणाची पोळी भाजून घेतात. १८व्या शतकात ब्रिटीश राजवटीमध्ये पोलीसांचे गणवेश पांढऱ्या रंगाचे होते. परंतु भारतामधील पोलीसांचा गणवेश १८४७ मध्ये सर हॅरी बर्नेट लुम्सडेन यांनी पांढऱ्या रंगाऐवजी खाकी रंग केला. एकप्रकारे ब्रिटीशांनी किमान गणवेशापुरते का होईना भारताशी मिळते-जुळते घेतले.

## नैतिक अधिकार व उत्तरदायित्व :

सध्या चालू असलेल्या विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभातील ड्रेसकोडविषयी बोलण्याचा नैतिक अधिकार आजी-माजी अधिकाऱ्यांना नाही. प्रसारमाध्यमे हे समाजाचा तिसरा डोळा असतात. जे घडते त्यांच्या चांगल्या-वाईट बाजू समाजासमोर मांडताना दिसतात. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना याबाबतीत बोलण्याचा मत मांडण्याचा अधिकार असतो. कारण हे दोन्ही घटक स्वतःला समाजाचे देणेकरी समजतात. आजी-माजी अधिकारी फक्त हजेरी लावतात. जसे सेवानिवृत्तांना पेन्शन घेण्याकरीता दरवर्षी हयात असल्याचे प्रमाणपत्र द्यावे लागते, तसे हे आजी-माजी अधिकारी असे विषय निघाले की मत प्रदर्शन करून आपली हजेरी लावतात. हे अधिकारी स्वतः पदावर असताना फॅशन कि शौक म्हणून सरकारी बंगल्यांना इटालियन मार्बल, फ्रेंच कमोड, चिनी शॉवर्स, फर्निचर्स बदलून घेतात. परदेशी बनावटीच्या कार्यालयीन कामकाजासाठी चारचाकी गाड्या खरेदी करतात. हा सर्व पैसा शासन, विद्यार्थ्यांच्या शुल्कातील असतो. स्वतःच्या बायोडेटा, पदव्या अडचणीत आलेल्या, त्यांच्या पंचवार्षिक कार्यकालातील कामकाजावर आक्षेप व चौकश्या असणाऱ्यांनी भाष्य करणे किती योग्य? अवैध नोकरभरती, अवैध गुणवाढ प्रकरणे यामध्ये निलंबित केलेल्यांना पुन्हा सेवेत रूजू करून घेणाऱ्यांनी विद्यापीठांच्या नियम किंवा प्रथांबद्दल भाष्य करणे अयोग्य आहे. ज्यांनी एखाद्या संशोधकास संशोधन करण्यास आडकाठी आणली व प्रोत्साहन देण्याऐवजी त्याचे खच्चीकरण करणाऱ्यांना शैक्षणिक क्षेत्राबद्दल भाष्य कसे करू शकतात? कार्यालयाच्या चारचाकी वाहनांना कार्यालयाच्या नावाचा, बोधचिन्हाचा झेंडा असतो. अधिकारी बदलला की झेंडा बदलण्याची फॅशनही आहे. पूर्वी जर साध्या कपड्याचा किंवा प्लास्टिक, रेडीअम स्टिकर असलेला झेंडा असल्यास नविन अधिकारी महागड्या कापडाला लॅमिनेशन, पितळेच्या चकचकीत ब्रास पॉलीशचा फ्लॅगरॉड गाडीला लावतात. त्याकरिता एखादा अधिकारी महिनाभर संशोधन करतो, तेही कार्यालयीन कामकाज सोडून. हे झाल इतरांबद्दल.

## पदवीप्रदान ड्रेसकोड संदर्भातील काही नियम :

परंतु ड्रेसकोड बदलण्याचा फंडा ज्यांनी आणला त्यांच काय? विद्यापीठ अध्यादेश १९७४ मध्ये अध्यादेश १०५, १०६ मध्ये या ड्रेसकोडचा उल्लेख दिसतो. रंग, आकार, पध्दत कशी असावी याचा उल्लेख या अध्यादेशामध्ये केला आहे. पुरूषांना नेहरू शर्ट-गुरूशर्ट-झब्बा (पांढऱ्या रंगाचा-क्रिम रंगाचा) आणि धोतर-सुरवार-पायजमा-पँट (पांढऱ्या रंगाची) व महिलांना पांढरी साडी, पांढरा ब्लाऊज, गुरूकुडता (पांढरा-क्रिम), सलवार खमीस (पांढरा), तसेच स्नातकांना उत्तरीयांचे रंग वेगवेगळे दिले होते.

कला शाखेतील विद्यार्थ्यांना गुलाबी, शास्त्र शोखकरीता पिवळा, विधी शाखेकरिता जांभळा इत्यादी रंगांच्या कडा असलेले उत्तरीयांची नियमांत तरतूद होती. परंतु १९९४, २०१७ च्या विद्यापीठ कायद्यात याबाबत फारसा स्पष्ट उल्लेख नाही. वर्ष २००० मध्ये विद्यापीठांनी परिपत्रक क्र. १७/२००० दि. १८/०२/२००० नुसार ड्रेसकोडमध्ये फारशा सुधारणा केल्याचे दिसत नाही. त्यामध्येदेखील प्रमुख पाहुणे व इतरांना कॅप व गाऊन घालण्याची तरतुद केली आहे. विद्यापीठ कायद्यानुसार कोणताही अध्यादेश बदलताना दुरूस्ती करताना किंवा नविन जाहिर करण्यापूर्वी मा. कुलपती तथा राज्यपाल यांची मंजुरी घेणे बंधनकारक आहे. असे नियम इंटरनेट किंवा वेबसाईटवर पाहिल्यास त्या नियमांतील काही ओळींचा फॉंट/अक्षरे इंग्रजी, मराठी, हिंदी किंवा इतर कोणत्याही भाषेशी जुळत नाही. मग जनतेचा भुलभुलैया करण्याचा हा झारीतील शुक्राचार्यांचा वेगळा प्रकार पहावयास मिळतो. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०११ च्या मसुदा समितीने पदवीप्रदान कार्यक्रमाच्या ड्रेसकोडसंबंधी स्पष्ट नियम केलेला दिसत नसला तरी महाराष्ट्र शासनाने (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) दि. २३ ऑगस्ट २०१० रोजी जाहिर केलेल्या परिपत्रकातील नियम ६ (ऊ) (२) मध्ये स्पष्ट नमूद केले आहे, ''सुधारीत नवीन अधिनियम हे केंद्रशासनाच्या धोरणाशी सुसंगत असावेत.'' परंतु आजची परिस्थिती पहाता कोठेही वरील तरतुदींचा कोठेही संदर्भ लागत नाही किंवा जवळपासचा संबंधही जाणवत नाही. संबंधित व्यवस्थेने वेळीच खुलासे करणेदेखील आवश्यक होते म्हणजे अनर्थ टळले असते. विद्यापीठ अनुदान आयोगाने व महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याने बरेचसे नियम, अध्यादेश हे समान ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. देशभरात समानता असणे कठीण असले तरी किमान प्रत्येक राज्यात समानता हवी. परंतु जिल्हानिहाय, राज्यनिहाय विविधता दिसून येते आणि म्हणूनच असे प्रसंग घडतात.

पदवीप्रदान समारंभाच्या निमीत्ताने इतरही बऱ्याच गोष्टी घडत असतात. वर्ष १९४९ ते १९९९ पर्यंत पदवीदान हा शब्द प्रचलीत होता. परंतु एका ज्येष्ठ मराठी साहित्यिकाने पदवीदान ऐवजी पदवीप्रदान शब्द वापरण्याबाबत विद्यापीठांना सांगितले आणि तदनंतर आजपर्यंत पदवीप्रदान हा शब्द वापरला जावू लागला. १९४९ ते १९९८ दरम्यान संस्कृत भाषेत वाचन होत असे. १९९८ नंतर ''शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याबाबत'' परिपत्रक काढले आणि नंतर संस्कृतऐवजी मराठी भाषेत पदवीप्रदान समारंभात वाचन होवू लागले. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये याची मूळ तरतुद आढळते. १९४९ ते २००५ सालापर्यंत पदवीप्रमाणपत्र हस्ताक्षरात (कर्सुलिपी) लिहीण्याची पध्दत होती. त्याचे प्रत्येक प्रमाणपत्रास दोन व पदवुत्तर प्रमाणपत्रास चार रूपये मिळत असे. त्याकरिता टाक, दऊत, बोरू, निप पेन यांचा वापर केला जात असे. आता ही कला लोप पावली आहे आणि याचे वारसदार बेरोजगार झाले आहेत. परंतु ही पध्दत बंद करून संगणकावर छपाई होवू लागली. त्याकरीता कागद खरेदी, छपाई, लॅमीनेशन, कव्हर्स यांच्या कंत्राटदारांचा प्रवेश झाला, हस्तलिखीत प्रमाणपत्रे लिहीणाऱ्यांच्या पोटावर पाय पडला. या कामांचे कंत्राटदारही वर्षानुवर्षे ठरलेले. त्यामुळे काय घडत असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. कधीकधी चुकीच्या छपाईमुळे लाखो प्रमाणपत्रे वाया गेल्याची बातमीदेखील वाचनात आली होती. काहीवेळा राज्यपालांची पदवीप्रदान कार्यक्रम आयोजित करण्यासाठी परवानगी न घेतल्याने कार्यक्रम रद्द करावे लागले. छपाईचा, कागदाचा खर्च, सभा-मंडप व इतर खर्च वाया गेला. ज्यांच्या चुकीमुळे हे घडले त्यांच्यावर कोणतीही कारवाई अथवा आर्थिक वसुली झाल्याचे ऐकिवात नाही, काही वेळा नोकऱ्या मिळत नाही म्हणून विद्यापीठास विद्यार्थ्यांना पदव्या परत देण्याबाबत वाचनात आले आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रलंबित राहिल्याने पदवीप्रदान समारंभ होवू न देण्याची निवेदने कामगार संघटनांनी प्रशासनाला दिल्याचे जाहीर आहेच. विद्यार्थ्याने स्वतःच्या कष्टाने मिळविलेली ही पदवी, त्यांच्या आयुष्याला पुरणारी ही भाकरी, त्याच करिअर, कुटुंब, भविष्य ज्याचेवर अवलंबून अशा त्याच्या आयुष्यातील एकमेव उत्साहात असे गालबोट का लावले जाते? पदवी प्रमाणपत्र म्हणजे बुध्दीजीवी असल्याच एक प्रमाणपत्र, जगातल्या कोणत्याही ठिकाणच्या नोकरी मिळण्याच एटीएम कार्ड किंवा वटणारा चेक असतो. ही परिस्थिती विद्यार्थ्याच्या आयुष्यात वारंवार येत नसते, जसा दरवर्षी वाढदिवस साजरा केला जातो, लग्नाचे वाढदिवस साजरे केले जातात, तसे पदवीप्रदान कार्यक्रमाचे वाढदिवस साजरे केले जात नाहीत. वाढदिवसावरून आठवल हल्ली विद्यापीठ प्रमुखांच्या वाढदिवसाच्या दिवशी पदवीप्रदान समारंभ अट्टाहास किंवा योगायोगाने येतो.

### काही इतर प्रथा सुरू होण्याची शक्यता :

विद्यापीठांचे इतर बरेच विभाग असतात. उदा. परीक्षा विभाग. कदाचित विविध परीक्षांचे निकाल परीक्षा विभागाच्या अधिकारी किंवा संबंधित सेवकांच्या वाढदिवशी जाहीर होण्याची फॅशन सुरू होईल. शैक्षणिक पात्रता विभागाचे जिल्हानिहाय शैक्षणिक पात्रता शिबीर असतात, शैक्षणिक विभागांत शिक्षक मान्यता, महाविद्यालय मान्यतेचे शिबीर असतात. अशी शिबीरे अधिकाऱ्यांच्या वाढदिवशी आयोजित करण्याची प्रथा, पध्दत किंवा फॅशनही सुरू होईल असे वाटते. खेळांच्या, शैक्षणिक स्पर्धादेखील इतर अधिकाऱ्यांच्या वाढदिवशी आयोजित केल्या जातील. गेल्या दशकापासून महाविद्यालये, शैक्षणिक विभागांतील विद्यार्थ्यांमध्ये टाय डे, जीन्स डे, सुटकोट डे, रोज डे, ट्रेडिशनल डे, साडी डे इत्यादी साजरा करण्याची फॅशन झाली आहे. पारंपारिक, सांस्कृतिक पोषाख त्यादिवशी घालून साजरा केला जातो. हल्ली तरूणाईप्रमाणेच वृध्दांमध्येदेखील दाढी, मिशी, हातावर, पायावर, मानेवर, मनगटावर व शरीराच्या इतर अवयवांवर दिसेल अशा प्रकारचा गोंदण (टॅटू) काढण्याची फॅशन आली आहे.

### ड्रेसकोडसारख्या इतर बाबींच काय?

कदाचित या ड्रेसकोडच फॅड काढून, वादळ तयार करून स्वतःला 'बेस्ट ॲक्टर इन निगेटीव्ह रोल', जस सिरीयल ॲवॉर्ड फंक्शन असत, त्याप्रमाणे प्रसिध्द होण्यासाठी केलेली कृती असावी. कारण काहीजण काहीवेळा बरीच कामे - कृती करण्याचा व त्यातून स्वतःला प्रसिध्दी मिळविण्याचा प्रयत्न करतात, परंतु प्रसिध्दी मिळत नाही. म्हणून काही वादळ माजविणाऱ्या कृती करून किमान नकारात्मक भूमिकेतून प्रसिध्दी मिळविताना दिसतात. तो हा प्रकार असावा. जर एखाद्या मंत्री महोदयाने अथवा वरिष्ठांनी अथवा स्वतः घेतलेल्या निर्णयामुळे इंग्रज किंवा परदेशी अनुकरण ना करण्याचे उद्दीष्ट असेल तर मग ते फक्त कपड्यांपुरतेच का? इंग्रजांनी बांधलेल्या इमारतींमधील यांच्या कार्यालयाचा त्याग का केला गेला नाही? किंवा विदेशी बनावटीच्या व शासकिय खर्चाने खरेदी केलेल्या शासकिय वाहनांचा वापर करण्याचे का टाळले जात नाही? आजही अशा कार्यालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रोजनिशी/दैनंदिनी/डायऱ्या यांच्या मुखपृष्ठावर इंग्रजांनी बांधलेल्या वास्तूंचे फोटो असतात आणि म्हणूनच संबंधितांना विनंती आपला जलवा दाखविण्यासाठी इतर बरीच क्षेत्रे आहेत की जेथे आपल अस्तित्व, वर्चस्व, बुध्दी, राजकारण, युक्ती, शक्ती, चातुर्य दाखविले जाईल आणि हा जलवा दाखविण्यासाठी विद्यापीठाचे पदवीप्रदान समारंभ म्हणजे फॅशन शो होऊ नये.

### संदर्भ :-


१) ड्रेसकोड बदलाला विद्यार्थ्यांचा अल्प प्रतिसाद : दै. लोकमत दि. १२ जानेवारी २०१९ पृष्ठ २.
२) पदवीप्रदानचा ड्रेसकोड बदलून ...... दै. लोकमत दि. १२ जानेवारी २०१९ पृष्ठ २.
३) विद्यापीठ अध्यादेश क्र. १०५, १०६ वर्ष १९७४.
४) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, २०१६.
५) The Maharashtra Public Universities Act 2011, Report of Committee No.2.
६) महाराष्ट्र शासन (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०/(१०६/१०)/विशि-४(भाग-२) दि. २३ ऑगस्ट २०१०.
७) पुनर्मुल्यांकन प्रकरणी आणखी मासे गळाला : दै. सकाळ दि. १७ डिसें. २०१२
८) विद्यापीठांच्या संरचनेत आमूलाग्र परिवर्तनाची गरज : दै. लोकमत दि. ३ मे २०१८. पुष्ठ ६.
९) पीएच.डी. चे विद्यार्थी फेलोशिपच्या प्रतीक्षेत : दै. लोकमत, हॅलो पुणे दि. ३ मे २०१७, पृष्ठ १.
१०) विलंब, अतिविलंब शुल्क बेकायदा : दै. सकाळ दि. २८ ऑक्टो. २०१७, पृष्ठ-४.
११) विद्यापीठ ढिसाळ कारभाराविरोधात विद्यार्थी संघटनांची निदर्शने : दै. महाराष्ट्र टाईम्स, दि. २७ सप्टें. २०१७, पृष्ठ ३.
१२) कॅगकडे गैरव्यवहारांच्या तक्रारी : दै. लोकमत दि. १४ सप्टें. २०१७, पृष्ठ १.
१३) कुलसचिव घेतात स्वतंत्र मानधन : दै. लोकमत दि. २० फेब्रु. २०१८, पृष्ठ २.

१४) रोजगार न देऊ शकणाऱ्या पदव्या परत घ्या : दै. लोकमत दि. ३ मे २०१८, पृष्ठ १.
१५) विद्यापीठाचा नॅकचा अहवालही वादात : दै. लोकसत्ता दि. २ नोव्हें. २०१६, पृष्ठ ५.
१६) पदवीप्रदान समारंभ अचानक स्थगित : दै. सकाळ दि. १० मे २०१७, पृष्ठ ४.
१७) माहिती देण्यास विद्यापीठाची आडकाठी : दै. लोकमत दि. २६ डिसें. २०१७, पृष्ठ १.
१८) विद्यापीठाशी नाळ असलेला कुलगुरू हवा : दै. सकाळ दि. ९ मे २०१७ पृष्ठ-७.
१९) विद्यापीठाच्या अनागोंदी कारभाराची होणार चौकशी : दै. पुढारी दि. १८ मार्च २०१७.
२०) प्रोत्साहन भत्त्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांचे पैसे अधिकाऱ्यांच्या खिशात : दै.सकाळ, TODAY, दि. २६ मार्च २०१७, पृष्ठ १.
२१) पीएच.डी. विद्यार्थ्यांचे विद्यावेतन बंद : दै. लोकमत, हॅलो पुणे, दि. २४ मे २०१८, पृष्ठ १.
२२) विद्यापीठात नोकरीच्या बनावट नियुक्तीपत्राने फसवणूक : दै. लोकमत दि. २० ऑगस्ट २०१४, पृष्ठ ४.
२३) संशोधनाच्या नावाखाली संगनमताचा बाजार : लोकप्रभा दि. १५ डिसेंबर २०१७ पृष्ठ १२ ते १५.
२४) विद्यापीठ की भ्रष्टाचाराच कुरण : साप्ताहिक चपराक : डिसेंबर २०१७.



**डॉ. तुषार निकाळजे**

LBP PUBLICATION